दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN Finolex OKOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ४ थे अंक ६४ वा गुरूवार दि.०८ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# नवनीत राणांना महायुतीतून बाहेर काढा



अमरावती : प्रतिनिधी राज्यपालपदाच्या नियुक्तीवरून महायुतीत चांगलीच खडाजंगी रंगली असताना आता अमरावती मतदारसंघात महायुतीची डोकेदुखी आणखी वाढवणारी बातमी समोर आली आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि माजी खासदार आनंदराव अडसूळ यांनी नुकतीच महायुतीतील आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली आहे. सोबतच त्यांनी अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांच्यावरही निशाणा साधला. त्या पाठोपाठ आता शिवसेनेचे नेते अभिजित अडसूळ यांनीदेखील नवनीत राणा यांच्याविरोधात दंड थोपटले आहेत.

माजी खासदार नवनीत राणा यांना आवरा अथवा महायुतीतून बाहेर काढा, किंबहुना आम्हाला वेगळा निर्णय घ्यायला भाग पाडू नका, असा थेट इशारा अभिजित अडसूळ यांनी महायुतीतील उच्चपदस्थ नेत्यांना दिला आहे. राणा दाम्पत्यामुळे महायुतीत मिठाचा खडा पडत आहे. आमचा स्वाभिमान दुखावला तर आम्हीही शिवसैनिक आहोत हे लक्षात घ्या, असेही अभिजित अडसूळ म्हणाले.

अपमान सहन केला जाणार नाही पुढे बोलताना अभिजित अडसूळ म्हणाले की, अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांच्या सांगण्यावरून आम्ही दोन ते तीन वेळेस माघार घेतली आहे, तरी राज्यपालपद आनंदराव अडसूळ यांना का नाही? अमित शहा यांनी आनंदराव अडसूळ यांना राज्यपाल करणार, असा शब्द मार्च महिन्यात दिला होता. मग या यादीमध्ये आनंदराव अडसूळ यांचे नाव का नाही? असा सवाल उपस्थित करत महायुतीत भाजपकडून आमच्यावर अन्याय झाला असल्याची खंत कॅप्टन अभिजीत अडसूळ यांनी नुकताच बोलताना व्यक्त केली होती.

राणा यांनीच केला घात आमदार रवी राणा हे कायम वाचाळपणे बोलतात. राणा यांनीच त्यांच्या पत्नीचा घात करून त्यांना पाडले. जिल्ह्यातील एकाही नेत्यासोबत त्यांचे चांगले संबंध नाहीत. महायुतीत खडा टाकण्याचे काम रवी राणा करत आहेत. शिवसेनेच्या नेत्याबाबत अर्वाच्च भाषेत बोलणे योग्य नाही. खोटी प्रमाणपत्रं बनवून रवी राणा यांनी जनतेचा विश्वासघात केला आहे. त्यामुळे जनतेनेही त्यांना जागा दाखवली. आनंदराव अडसूळ हे महायुतीचे नेते आहेत. आमच्या नेत्याबाबत अशी भाषा वापरली जात असेल तर युतीत रहायचं की नाही, हाही विचार आता आम्हाला करावा लागेल.

## शाकाहारी थाळी महागली!

पुणे : प्रतिनिधी यंदा जुलैमध्ये अन्नधान्याच्या किमती वाढल्या होत्या. जुलैमध्ये शाकाहारी आणि मांसाहारी थाळीच्या किमती वाढल्या आहेत. शाकाहारी थाळीमध्ये रोटी, भात, डाळ, दही, सलाडसोबत कांदा, बटाटा, टोमॅटो यांचा समावेश होतो. मांसाहारी थाळीमध्ये शाकाहारी थाळीसारखेच अनेक पदार्थ असतात पण मसूर ऐवजी चिकन (ब्रॉयलर) आहे. 'रोटी राईस रेट' नावाची रेटिंग एजन्सी क्रिसिलने जारी केलेल्या अहवालानुसार, या वर्षी जूनमध्ये शाकाहारी थाळीची किंमत २९.४ रुपये होती. ती वाढून जुलैमध्ये ३२.६ रुपये झाली. अशाप्रकारे, जूनच्या तुलनेत जुलैमध्ये शाकाहारी थाळी सुमारे ११ टक्क्यांनी महाग झाली आहे. टोमॅटोच्या किमती वार्षिक आधारावर ४० टक्क्यांनी कमी झाल्यामुळे जुलैमध्ये शाकाहारी थाळी वार्षिक आधारावर ४ टक्क्यांनी स्वस्त झाली आहे.

## चीनच्या ३०० कंपन्यांविरोधात भारताने उचलले कठोर पाऊल!



नवी दिल्ली : वृत्तसंस्था भारत सरकारने चीनी कंपन्यांविरोधात कठोर पावले उचलली आहेत. सायबर फसवणूक प्रकरणात विदेशातील कंपन्यांची भूमिका समोर आली आहे. त्यानंतर चीनी कंपन्यांवर कारवाई सुरु झाली आहे. सायबर फसवणूक प्रकरणात संबंध असल्याच्या कारणावरुन चीनच्या ३०० पेक्षा जास्त कंपन्यांच्या विरोधात जीएसटी विभागाने पाऊल उचलले आहे. त्यांची जीएसटी नोंदणी रद्द केली आहे. या कंपन्या ऑनलाईन जाहिराती देऊन जुगार खेळण्यासाठी आकर्षित करत होत्या. सुरक्षा संस्थांकडून मिळालेल्या माहितीनंतर जीएसटी विभागाने हे पाऊल उचलले आहे. जीएसटी विभागाने १५ हजार कोटी रुपयांच्या फ्रॉडमध्ये सहभागी असलेल्या आरोपींची चौकशी केली. त्यानंतर सुरक्षा संस्थांकडून माहिती घेतली. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ३०० कंपन्यांची नोंदणी रद्द केली आहे. या कंपन्यांनी तीन वर्षांपासून रिटर्नसुद्धा दाखल केले नाही. या कंपन्यांकडून चीनमध्ये पैसे पाठवले जात होते. त्याचा तपास आर्टिफिशल इंटेलिजेंसच्या मदतीने केला. त्यानंतर सायबर फसवणुकीचा प्रकार समोर आला.

नोएडा पोलिसांना जीएसटी फ्रॉड प्रकरणातील सायबर गुन्हेगारांचा संबंध चीनशी असल्याचे तपासातून समोर आले. सायबर गुन्हेगार सर्वसामान्य लोकांना लिंक पाठवून त्यांना ॲप डाऊनलोड करण्यास लावत होते. त्यातील अनेक ॲप चीनमधील होते. या ॲपचे काम चालवण्यासाठी सायबर गुन्हेगार नोएडामध्ये बनावट फर्म तयार करत होते. त्याद्वारे मोठ्या प्रमाणावर जीएसटीची चोरी करतात. तसेच दुसरीकडे सर्वसामान्य लोकांना विविध आमिष दाखवून त्यांची फसवणूक करतात. जीएसटी विभागाच्या कारवाईमुळे आता या प्रकारांना वचक बसणार आहे.जीएसटी चोरी, एआयद्वारे तपास जीएसटीचे अपर आयुक्त (प्रथम श्रेणी) चांदणी सिंह यांनी बनावट नोंदणी करणा-या कंपन्यांची कुंडली उघडली. त्यानंतर त्या खात्यांची तपासणी आर्टिफिशिल इंटलिजेन्सच्या माध्यमातून केली. जीएसटीकडून कर चोरी प्रकरणात मोठ्या प्रमाणावर एआयचा वापर केला जात आहे. या कामासाठी आता नोएडासोबत लखनऊची टीमसुद्धा कामाला लावण्यात आली आहे.

## स्वप्नील कुसाळे भारतात दाखल; जल्लोषात स्वागत



नवी दिल्ली : वृत्तसंस्था पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० मीटर ३ पोझिशन्स स्पर्धेत कांस्यपदक पटकावत भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारा आणि भारताचा पहिला पदक विजेता स्वप्नील कुसाळे आज (दि. ७) भारतात दाखल झाला. नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी विमानतळावर त्याचे जोरदार स्वागत करण्यात आले. कांबळवाडी (जि. कोल्हापूर) येथील स्वप्नील कुसाळे याने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतासाठी ५० मीटर रायफल ३ पोझिशन स्पर्धेत ऐतिहासिक पदक जिंकून दिले आहे. त्यानंतर त्याच्यावर सर्वच स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होऊ लागला आहे. तर मध्य रेल्वेने त्याला तिकिट चेकर पदावरून बढती दिली असून ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी स्पोर्टस् सेल म्हणून पदोन्नती दिली आहे.


## 'धनुष्यबाण' फाडल्याने राडा; शिंदे-ठाकरे गट आमने-सामने



मुंबई : प्रतिनिधी प्रभादेवी येथे फुटपाथवर लावलेल्या बोर्डावरील धनुष्यबाणाचे चिन्ह उद्धव ठाकरे गटाच्या पदाधिका-यांनी काढल्याचा आरोप शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी केला. यावरून उबाठा आणि शिंदे गट आमने-सामने आल्यानंतर जोरदार राडा झाला. याप्रसंगी शिंदे गटाचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात आक्रमक झाल्याचे दिसून आले. याबाबत शिंदे गटाचे माहीम विधानसभा प्रमुख कुणाल वाडेकर यांनी पोलिसांत यापूर्वी तक्रारसुद्धा केली होती. प्रभादेवी, रवींद्र नाट्य मंदिराशेजारील फुटपाथवर लावण्यात आलेल्या होर्डिंगवरील धनुष्यबाण हे चिन्ह मंगळवारी रात्री उबाठा गटाच्या पदाधिका-यांनी काढले. यावरून शिंदे गटाचे शिवसैनिक आक्रमक झाले. यानंतर दोन्ही गटांचे पदाधिकारी आमने-सामने आल्यानंतर दोघांमध्ये मोठ्या प्रमाणात राडा झाला.

फुटपाथवर लावण्यात आलेला हा बोर्ड शिंदे गटाचे स्थानिक आमदार सदा सरवणकर यांच्या स्वखर्चातून लावण्यात आल्याचा दावा शिंदे गटाच्या शिवसैनिकांनी केला. होर्डिंगवरील धनुष्यबाणाचे चिन्ह कापून तिथून पळ काढताना एकनाथ शिंदे गटाच्या शिवसैनिकांनी ठाकरे गटाच्या पदाधिका-यांना रंगेहाथ पकडल्याने हा वाद चिघळला गेला, अशी माहिती सूत्रांनी दिली.

## 'डेल' कंपनीतील १२,५०० मॅनेजर्सना मिळाला 'लेऑफ'




नवी दिल्ली : वृत्तसंस्था कॉम्प्युटर क्षेत्रातील दिग्गज कंपनी 'डेल'ने मॅनेजर लेव्हलच्या सुमारे १२,५०० कर्मचा-यांना कामावरून काढून टाकलं आहे. कंपनीने सेल्स डिव्हिजनमध्ये मोठी फेररचना जाहीर केली आहे. यामुळे ऑपरेशन्सचे आधुनिकीकरण आणि 'एआय'वर लक्ष केंद्रित करण्याच्या रणनीतीचा एक भाग म्हणून ही कर्मचारी कपात करण्यात आली. 'बिझनेस इनसाइडर'ने दिलेल्या वृत्तानुसार, कंपनीनं ६ ऑगस्ट रोजी अंतर्गत मेमोमध्ये कर्मचा-यांना या बदलांची माहिती दिली, ज्यात सेल्स टीमचं सेंट्रलायझेशन करणं आणि नवीन एआय-केंद्रित सेल्स युनिट तयार करण्याच्या योजनेची रूपरेषा देण्यात आली. 'न्यूजबाइट'ने दिलेल्या वृत्तानुसार, यामध्ये किती कर्मचा-यांना नारळ देण्यात आलेला आहे याची नेमकी संख्या अधिकृतरित्या निश्चित करण्यात आलेली नाही, परंतु सुमारे १२,५०० कर्मचा-यांना कामावरून काढून टाकण्याचा फटका बसला आहे. याचा परिणाम डेलच्या सुमारे १० टक्के कर्मचा-यांवर झाला आहे. ग्लोबल सेल्स मॉडर्नायझेशन अपडेट या नावानं हा मेमो सीनिअर एक्झिक्युटिव्ह बिल स्कॅनेल आणि जॉन बर्न यांच्याद्वारे पाठवण्यात आला. 'लाइव्ह मिंट'नं दिलेल्या वृत्तात, नेमक्या किती कर्मचा-यांना कामावरून काढून टाकण्यात आले आहे, याचा खुलासा करण्यात आलेला नाही. विक्री विभागातील अनेक कर्मचा-यांनी बंद किंवा फटका बसलेल्या सहका-यांना ओळखत असल्याचं सांगितलं. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या कपातीचा फटका प्रामुख्यानं व्यवस्थापक आणि वरिष्ठ व्यवस्थापकांना बसला आहे.

## मग विनेशबाबत घडले तेही रोखायला हवे



मुंबई : प्रतिनिधी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये विनेश फोगाटला अपात्र घोषित करण्यात आले आहे. यामुळे देशभरात खळबळ उडाली आहे. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करत भावूक प्रतिक्रिया दिली आहे. सर्व स्तरांतून आता प्रतिक्रिया येत आहेत. अशात शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी यावरून मोदींना टोला लगावला आहे. दरम्यान, जयंत पाटील म्हणाले, 'विनेश फोगाट यांचा परफॉर्मन्स गेले काही दिवस खूप चांगला होता, मग अचानक काय झाले. १०० ग्रॅम वजन कसे वाढले? जर ती जिंकून आली तर तिला काही दिवसांपूर्वी जी वागणूक मिळाली होती, तिने जे आंदोलन केले होते ते आठवून आपल्या विरोधी लाट निर्माण होईल असे कोणाला वाटले का? त्यामागे काही षडयंत्र असू शकते का? याचा विचार केला पाहिजे, असे म्हणत विनेश फोगाटच्या विजयानंतरही झालेल्या पराभवावर जयंत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मोदी है तो मुमकिन हैं असे म्हणतात, त्यांनी युक्रेन-रशिया युद्ध रोखले असे म्हणतात मग त्यांनी विनेशबाबत जे घडत आहे, ते रोखायला हवे, असेही पाटील यांनी म्हटले आहे.

## अत्तराच्या गोदामाला भीषण आग; तरुणाचा मृत्यू



नागपूर : प्रतिनिधी शहरातील अति गजबजलेल्या इतवारीच्या मुख्य बाजारपेठेतील अत्तराच्या गोदामाला आज सकाळच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत एका तरुणीचा मृत्यू झाला, तर तीन गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अनुष्का बाखडे (१७) असे आगीत होरपळून मृत्यू झालेल्या तरुणीचे नाव आहे. तर तिचे आई-वडील, भाऊ हे देखील जखमी झाले आहेत.इतवारीतील खापरीपुरा परिसरात प्रवीण बाखडे यांच्या मालकीचे रेणुका नॉव्हेल्टी नावाचे दुकान आहे. तेथील दुकानाच्या वर ते कुटुंबासह राहतात. आज सकाळी संपूर्ण कुटुंब झोपलेले असताना तळमजल्यावरील गोडाऊनमध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागली. कुणाला काही कळण्यापूर्वी आगीने संपूर्ण इमारतीला वेढले होते. घटनेची माहिती मिळाल्यानंतर लगेच अग्निशमन विभागाचे अधिकारी आठ गाड्यांसह घटनास्थळी पोहोचले. गोडाऊनमध्ये अत्तर आणि चप्पल ठेवण्यात आले होते. प्लास्टिकच्या वस्तू असल्याने आतमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यात मोठी अडचण येत होती. त्याही परिस्थितीत अग्निशमन दलाचे जवान घरामध्ये पोहोचले आणि त्यांनी चार जणांना बाहेर काढले.

## संपादकीय....

# एक 'बांगला' बने न्यारा

भारताचे ज्याच्याशी बरे चालले होते असा बांगलादेश हा एकमेव शेजारी देशदेखील आता दक्षिण आशियातील आपल्या अस्थिर शेजाऱ्यांपैकी झाला, हे काळजी वाढवणारेच बांगलादेशातील घडामोडींवर 'लोकसत्ता'ने 'वंगदेशी विद्यार्थ्यांचा विद्रोह' (२२ जुलै) या संपादकीयात विद्यार्थ्यांची वावटळ शमणे अवघड असल्याचे भाकीत केले होते. तसेच झाले. या विद्यार्थ्यांनी अखेर पंतप्रधान बेगम शेख हसीना यांनाच पदच्युत केले आणि जीव वाचवण्यासाठी या बेगमेस देश सोडून भारतात आश्रय घ्यावा लागला. जे झाले त्यात आश्चर्य वाटावे असे काही नाही. आपले सर्व काही उत्तम चाललेले आहे आणि आपल्या धोरणांमुळे देशाचेही उत्तम चालू आहे असे मानणारे स्वमग्न सत्ताधीश लोकशाहीचा अभाव असेल तर याच मार्गाने सत्ताच्युत होतात. लोकशाही नसेल तर आ-पले काय चुकते हे सांगणारे ना विरोधक असतात ना माध्यमे ते करू धजतात. त्यात विकासाचा फुगा फुगवलेला असेल तर काही बोलायचीच सोय नाही. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याप्रमाणे शेख हसीना यांनी आपल्या हुकूमशाही धोरणांच्या जोरावर काही आर्थिक विकास घडवून आणला खरा. पण अशा दमदाटीने होण-ारा विकास तकलादू असतो आणि समाजातील सर्वांच्या गरजा भागवण्यास पुरेसा नसतो. हे सर्व बांगलादेशात दिसून येत होते. पण आपल्या सिंहासनाखाली लागलेल्या आगीची दखल घेण्याचे शहाणपण पंतप्रधान शेख हसीना यांनी दाखवले नाही. अखेर विद्यार्थ्यांच्या विद्रोह वणव्यात त्यांनाच पदच्युत व्हावे लागले. या सगळ्याचे संदर्भ अनेक आहेत. उदाहरणार्थ या उद्रेकात चीन वा इस्लामी धर्मातिरेक्यांची भूमिका. बांगलादेशातील घडामोडींविरोधात विद्यार्थी भले उघडपणे व्यक्त झाले असतील. पण त्यांनी तसे व्यक्त व्हावे यासाठी त्यांना कोणाचेच उत्तेजन नव्हते असे मानणे अवघड. या संदर्भात चीन आणि इस्लामी धर्माभिमानी या दोघांवर संशयाची सुई रोखली जाते. यात चीनचा संशय अधिक घेण्यास जागा आहे. कारण शेख हसीना आणि चीन यांच्यातील संबंधांत तणाव निर्माण झालेला होता आणि अवघ्या काही आठवड्यांपूर्वीच बेगम साहिबांवर आपला चीन दौरा अर्ध्यावर सोडून येण्याची वेळ आली होती. त्यांच्या चीन दौऱ्यात अध्यक्ष क्षी जिनपिंग हे शेख हसीना यांना भेटलेही नाहीत. या दौऱ्यात चीनने त्यांची तशी उपेक्षाच केली. त्यामुळे दौरा अर्ध्यावर सोडून मायदेशी परतण्याचे टोकाचे पाऊल हसीना यांस उचल-ावे लागले. त्यानंतरही चीनने संबंध सुधारासाठी काही प्रयत्न केले नाहीत. हसीना यांची चीनपेक्षा भारतावर अधिक भिस्त होती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे संबंध अत्यंत सौहार्दाचे होते. भारतीय उपखंडात आपल्या हितसंबंधांत कोणी वाटेकरी झालेले चीनला चालत नाही. बांगलादेशातील उद्रेकास चीनची फूस असू शकते असे मानण्यामागे हे एक कारण असू शकते. तसे ते असेल तर मग या साऱ्यात खुद्द बांगलादेशी सरकारने आणि त्या देशाचा मित्र, हितरक्षक अशा भारताने अधिक सजग असणे आवश्यक होते. त्या देशातील वाढत्या भारत प्रभावाविरोधात चीन बघ्याची भूमिका घेणार नाही हे उघड होते. तेव्हा आपल्या देशातील नाराजीचा उद्रेक हाताबाहेर जाणार नाही याची खबरदारी शेख हसीना यांनी घ्यायला हवी होती आणि चीनच्या संभाव्य कुरापतीविरोधात त्यांना सतर्क करण्याची जबाबदारी आपण घ्यायला हवी होती. यातील पहिल्याबाबत त्या किती निष्प्रभ ठरल्या, ते स्पष्टच आहे. दुसऱ्याबाबतचा तपशील उपलब्ध होणे अवघड. तथापि बांगलादेश सोडताना त्यांना आपल्या हवाई दलाने कशी सुरक्षा दिली वगैरे अनावश्यक शौर्यकथांत काही अर्थ नाही. कारण त्यांच्या जिवास अपाय करण्यात चीनला रस नव्हता. त्यांना सत्ताच्युत करणे चीनसाठी पुरेसे होते. ते झाले. गेल्या जवळपास तीन दशकांतील दोन दशके बांगलादेशावर शेख हसीना यांनी राज्य केले. विरोधकांच्या मुसक्या आवळणाऱ्या या देशातील लोकशाही केवळ नावापुरती होती आणि शेख हसीना यांच्या सत्त-ेस लष्कराचाही आशीर्वाद होता. 'बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी' या प्रमुख विरोधी पक्षाने बहिष्कार घातलेल्या निवडणुकीत शेख हसीना यांना यंदाच्या जानेवारीत पुन्हा सत्तासंधी मिळाली आणि तो देश शब्दश: एकपक्षीय लोकशाही बनला. दरम्यानच्या काळात खरे तर हसीना यांच्या धोरणांनी आर्थिक विकासास चांगली चालना मिळालेली होती. तयार कपड्यांच्या कारखानदारांचे जागतिक केंद्र बनल्याने बांगलादेशात महिला रोजगारात लक्षणीय वाढ झाली आणि मानव्य विकास निर्देशांकही चांगलाच सुधारला. पण तीत सातत्य राखता आले नाही. आर्थिक विकास ही सततची प्रक्रिया असते. त्यात एकदाच आघाडी घेऊन चालत नाही. मिळालेली आघाडी टिकवणे महत्त्वाचे असते. ते हसीना यांस जमले नाही. या पार्श्वभूमीवर त्या देशातील जुन्या आरक्षण धोरणाच्या कढीस न्यायालयीन निकालामुळे पुन्हा उकळी आली आणि संतप्त विद्यार्थी रस्त्यावर उतरले. जवळपास ३०० जणांची हत्या आणि १० हजारांहून अधिकांस तुरुंगात धाडूनही विद्यार्थ्यांचा आक्रोश शांत होईना. कसा होणार? या १७ कोटींच्या देशात २० लाखांहून अधिक बेरोजगार आहेत आणि आटत्या सरकारी नोकऱ्यांत ७५ टक्क्यांच्या आसपास आरक्षण. यामुळे विद्यार्थी संतापले. त्यातून हे पुढचे रामायण घडले. त्यानंतर बांगलादेशी लष्करप्रमुखांनी हंगामी सरकार स्थापनेची घोषणा केली खरी. पण तीबाबत शंका घेण्यास बराच वाव आहे. लष्करशहांची सुरुवात बऱ्याचदा हंगामी असते. पण नंतर ते हात-पाय पसरतात आणि सत्ता ताब्यात घेतात. बांगलादेशातही तसे होते किंवा काय, हे पाहायचे. विरोधी पक्षीय नेत्यांची तुरुंगातून सुटका, सहमतीची भाषा अशी काही सकारात्मक लक्षणे या लष्करशहांत दिसतात. हे गणवेशधारी पुढे काय करतात ते महत्त्वाचे. तिथे जे झाले ते आपली काळजी वाढवणारे ठरते. दक्षिणेकडील श्रीलंका अद्यापही पुरता स्थिरावलेला नाही. उत्तरेतील नेपाळचा भरवसा देता येत नाही आणि त्या शेजारील भूतानचे काही खरे नाही. पाकिस्तानविषयी तर न बोललेलेच बरे, अशी परिस्थिती. पाकिस्तानपलीकडच्या अफगाणिस्तानातील तालिबानी जम्मूची वेस ओलांडून सहज भारतात येऊ लागलेले आ-हेत आणि पूर्वेकडच्या म्यानमारची अस्थिरता आपल्या ईशान्येकडील राज्यांत येऊन ठेपलेली आहे. अशा अस्थिर शेजाऱ्यांच्या गराड्यात आता या बांगलादेशाची भर. तेथे जे झाले ते आपले पित्त आणि जळजळ वाढवणारे आहे याचे कारण आपले ज्याच्याशी बरे चालले होते असा हा एकमेव शेजारी देश.

# बौद्धिक उपासमार आणखी किती काळ?

चांगल्या शिक्षणामुळे प्रत्येक इयत्तेत बुद्ध्यांक १ ते ५ गुणांनी वाढू शकतो. एखाद्या मुलाला त्याला शक्य असलेल्या बुद्ध्यांकापर्यंत पोहोचवण्यात अपयशी ठरणारा समाज, त्या मुलाची बौद्धिक उपासमार करत असतो. यावर प्रभावी ठरू शकेल, असा उपाय म्हणजे मूलभूत शिक्षणाचा दर्जा सुधारणे. त्यासाठी शाळांकडे लक्ष देण्याची राज्य सरकारची तयारी आहे? भारतातील आर्थिकदृष्ट्या तळातील ५० टक्के जनतेला काय हवे आहे? फुकट धान्य, शिक्षणात वा नोकऱ्यांमध्ये आरक्षण, फुकट वा सवलतीत घरे, विमानतळ, बोगदे, महामार्ग, मंदिरे? हे सर्व देणे शक्य आहे का आणि देणे योग्य आहे का याबद्दल थोडाफार ऊहापोह होऊ लागला आहे. पण एक महत्त्वाची गोष्ट चर्चेत येत नाही, ती म्हणजे सामान्य जनतेला मिळणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता. 'असर' या संस्थेने वर्षानुवर्षे केलेल्या सर्वेक्षणांतून चिंताजनक स्थिती समोर येते. या वर्षीच्या सर्वेक्षणातील काही निरीक्षणे: १४-१८ वयोगटातील २५ टक्के मुला-मुलींना दुसरीचे पुस्तक वाचता येत नाही. ५० टक्के मुलांना तीन आकडी संख्येला एक आकडी संख्येने भागात येत नाही. साहजिकच या मुलांना सरकारी नियम वाचता येणार नाहीत. वस्तू कशा वापरायच्या याविषयीच्या सूचना वाचता येणार नाहीत, आर्थिक व्यवहारांतली आकडेमोड करता येणार नाही. नवे काहीही शिकताना त्यांना अडचणी येतील आणि आत्मविश्वास खचेल. औपचारिकदृष्ट्या प्राथमिक शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचले असले तरी उच्च शिक्षण, नोकरी मिळणे आणि दैनंदिन व्यवहार, यांत खूप अडचणी येतील अशी भीती आहे. नोकऱ्यांच्या बाबतीत हे स्पष्ट दिसते. अत्युच्च पदव्या प्राप्त केलेल्या अनेक उमेदवारांना नोकऱ्या मिळत नाहीत, आणि त्याच वेळी रिक्त जागा भरण्यासाठी पात्र उमेदवार मिळत नाहीत, अशी विचित्र स्थिती आपल्यासमोर आहे. माहीत बरेच काही आहे पण त्या माहितीचा उपयोग करता येत नाही, ही आपल्या नव्या पिढीची शोकांतिका आहे. अशीच तक्रार उच्च शिक्षणातील प्राध्यापकांची सुद्धा आहे. आधीच्या वर्गातील अभ्यासक्रमच नीट येत नाही, समजलेला नाही, तर नवे काही शिकवणार तरी कसे, असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. अशा परिस्थितीत पात्रता नसलेल्या विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करणे, पदव्या देणे याचा दबाव येतो. महत्त्वाची कौशल्ये ('असर'च्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे) अवगत नसताना उत्तीर्ण होणे हा प्रकार शाळेपासून सुरू होतो, ही स्थिती आपल्या परिचयाची असेलच. शिक्षणाची गुणवत्ता चांगली नसण्याचा त्रास समाजातल्या दुर्बल घटकांना अधिक होतो. वरच्या स्तरांतील लोक जास्त पैसे खर्च करून खास शाळा वा खासगी शिकवण्यांची तरतूद करू शकतात. ही चैन दुर्बल घटकांना परवडण्यासारखी नसते. यामुळे असे होऊ शकते की आरक्षणामुळे विद्यार्थी पुढे जातात तर खरे, पण त्यांना मिळणारे शिक्षण झेपत नाही, कारण त्यांची प्राथमिक कौशल्येच (गणित आणि भाषा व चिकित्सक विचार प्रक्रिया) विकसित झालेली नसतात. हा त्यांचा दोष नाही. ज्या राजकारण्यांना दलितांबद्दल व एकुणात दुर्बल घटकांबद्दल कणव आहे त्यांनी हा मुद्दा उचलून धरला पाहिजे. सर्वांसाठी पहिली ते आठवीपर्यंतच्या उत्कृष्ट मूलभूत शिक्षणाची मागणी केली पाहिजे. विविध देशांच्या सरासरी बुद्ध्यांकांची (इंटेलिजन्ट कोशन्ट – आयक्यू) तुलना करता एक उद्बोधक चित्र समोर येते. विकसित देशांमधील बुद्ध्यांक सामान्यपणे ९५ च्या पुढे दिसतात, तर विविध सर्वेक्षणांतून मोजलेला भारतीय बुद्ध्यांक ७६-८२ दरम्यान दिसतो. बुद्ध्यांक ही संकल्पना पाश्चात्त्य असल्यामुळे हे घडत असेल असे म्हणावे तर अत्युच्च बुद्ध्यांक चीन, जपान, कोरिया यांचे असल्याचे दिसून येते. एवढेच कशाला, थेट परकीय गुंतवणुकीबाबत आपला प्रतिस्पर्धी व्हिएतनामचा बुद्ध्यांक ९० आहे! आणखी दोन गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील. शालेय शिक्षणाच्या मोजमापातदेखील ('असर'सारख्या संस्थांद्वारे करण्यात आलेल्या मूल्यमापनानुसारही) हे देश आपल्या पुढे आहेत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मानसशास्त्रीय संशोधनाप्रमाणे असे दिसते की चांगल्या



शिक्षणामुळे प्रत्येक इयत्तेत बुद्ध्यांक १ ते ५ गुणांनी वाढू शकतो! असे म्हणता येईल की एखाद्या मुलाला त्याला शक्य असलेल्या बुद्ध्यांकापर्यंत आपण पोहोचवू शकलो नाही, तर आपण त्याची बौद्धिक, मानसिक उपासमार करत आहोत! सारांश: मूलभूत शिक्षण सुधारणे अपरिहार्य आहे! आता आपण शिक्षणासाठी लागणाऱ्या खर्चाचा थोडा विचार करू. पहिली गोष्ट- शिक्षणशास्त्र आणि अर्थशास्त्र यातील संशोधनातून असे दिसते की शिक्षण ही उत्कृष्ट प्रकारची गुंतवणूक आहे. या गुंतवणुकीतून समाजाला प्रचंड परतावा मिळतो. आणि शिक्षणातही जास्त परतावा मूलभूत (पहिली-आठवी) शिक्षणामधून मिळतो. दुसरा विचार आपण असा करावा लागेल, की आपल्याला शिक्षणावर जास्त खर्च परवडेल का? २०२०-२१ मध्ये आपल्या देशाने आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) तीन टक्के खर्च शिक्षणावर केला (केंद्र आणि राज्य सरकारे मिळून). तो खर्च सहा टक्क्यांपर्यंत वाढवणे गरजेचे आहे, असे जाणकार सांगतात. जास्त स्पष्ट उदाहरण घेऊ. महाराष्ट्र राज्याने २०२०-२१ मध्ये मूलभूत (पहिली ते आठवी) शिक्षणावर सुमारे २४ हजार कोटी रुपये खर्च केले. तुलनेसाठी महाराष्ट्र सरकार वाहतूक प्रकल्पांवर करत असलेला किंवा प्रस्तावित खर्च पाहू. समृद्धी महामार्ग – ६० हजार कोटी, वर्सोवा- विरार समुद्री मार्ग ६० हजार कोटी, मेट्रो मार्ग प्रत्येक मार्गिकेसाठी १५-३० हजार कोटी रुपये. या खेरीज बोगदे, पूल यांचा खर्चही कमी नाही आणि वेळोवेळी त्यांच्या बातम्या वर्तमानपत्रांत येतातच. 'लाडकी बहीण' योजनेसाठी महाराष्ट्र सरकारने २५ हजार कोटींची तरतूद केली आहे. तेव्हा, सरकारला पैसे खर्च करणे अवघड नाही, प्रश्न आहे तो इच्छाशक्तीचा! भारताने 'सर्वांसाठी उत्कृष्ट मूलभूत शिक्षण' हे ध्येय अंगीकारले पाहिजे. सामाजिक न्याय आणि अर्थशास्त्र या दोन्ही दृष्टींनी हे चांगले ध्येय आहे. उत्कृष्टता साधण्यासाठी नव्या अभ्यासक्रमाची गरज नाही. आहे त्याच अभ्यासक्रमात पाठांतराऐवजी तर्काधिष्ठित विचार करण्यास शिकवावे, कौशल्ये आत्मसात करून ज्ञानाचा वापर कसा करावा, हे शिकवावे. प्रथम अभ्यासक्रमातील प्रत्येक विषयाचा / आपल्याला काय उपयोग आहे, हे विद्यार्थ्याला नीट समजावून सांगावे ज्यायोगे अभ्यासात स्वारस्य निर्माण होईल. प्रत्येक विषय शिकण्यात माहिती जाणून घेणे आणि कौशल्ये आत्मसात करणे असे किमान दोन पैलू असतात. उदाहरणार्थ, अंकगणिताच्या बाबतीत बेरीज, वजाबाकी इत्यादी क्रिया बिनचूक करता येणे आणि या क्रिया कधी वापरायच्या हे समजणे ही मूलभूत कौशल्ये आहेत. भाषेच्या संदर्भात शब्द संपत्ती तसेच व्याकरण हा माहिती जाणून घ्यायचा भाग झाला. पण संभाषण वा वर्णन वाचून त्यातून निष्कर्ष काढणे, प्रश्न विचारणे हा कौशल्याचा भाग आहे. तसेच आपल्याला पडणारे प्रश्न, समस्या, गाऱ्हाणी ही स्पष्टपणे, थोडक्यात आणि सभ्यपणे मांडणे हादेखील कौशल्याचा भाग होय. मूलभूत शिक्षणात भाषा आणि अंकगणित यातील कौशल्ये आत्मसात करण्यावर खूप भर हवा, कारण ही कौशल्ये इतर विषय शिकण्यासाठी अनिवार्य आहेत. हे अजिबात सोपे नाही. पण चांगले शिक्षक व चांगल्या शाळा हे सर्व आपसूक करतात. हे सर्वत्र होणे आवश्यक आहे. सरकारला अनेक खर्च करण्याची तरतूद करावी लागेल. शिक्षकांचे पगार (शिक्षण सेवक नकोत!), त्यांचे प्रशिक्षण, शाळांमधील पायाभूत सुविधा, शिक्षकांना शिकविण्यासाठी पुरेसा अवधी देणे आवश्यक आहे विविध सरकारी अभियाने अशा कामांमध्ये शिक्षकांना जुंपू नये. हे लक्षात ठेवावे की ही एका महत्त्वाच्या पण अवघड प्रवासाची सुरुवात आहे. त्याचे व्यवस्थापन, देखरेख खूप महत्त्वाची आहे. एखाद्या शाळेला वा एखाद्या शिक्षकाला मुलांना चांगले शिक्षण पुरवण्यात काय अडचणी येत आहेत त्याचा आढावा घेत राहून त्यावर सतत उपाय करत राहण्याशिवाय पर्याय नाही. आपण गेली ७७ वर्षे हा विषय मागे ठेवला आहे, पण आता तो मागे ठेवता येणार नाही.

# विमा कंपन्यांना दणका

विमा प्रकारांत आपला संपूर्ण हप्ता हा एक रक्कम' म्हणून जमा होत-ो आणि ही रक्कम वाढत जाते. मात्र युलिपमध्ये आपण भरलेल्या हप्त्यातील काही भाग वेगवेगळ्या प्रकारचे शुल्क म्हणून कापून घेतला जातो आणि उर्वरित रक्कमेतून विशिष्ट प्रकारच्या फंडांची युनिट्स त्या दिवशीच्या बाजारभावाने खरेदी केली जातात. याची स्टेटमेंट विमाधारकाला पाठवली जाते आणि त्यात सर्व तपशील दिलेला असतो. मुख्य म्हणजे हप्त्याची किती रक्कम जमा झाली आणि जमा झालेल्या युनिट्सचे बाजारमूल्य किती आहे तेही कळते.

वाचकहो, युलिप हा शब्द विमा घेणाऱ्या नवीन पिढीला ठाऊक आहे, तसाच तो जुन्या वाचकांनाही आठवत असेल. कित्येक वर्षांपूर्वी युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाने ही योजना अमलात आणली आणि ती अल्पावधीतच लोकप्रिय झाली. युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्लान अर्थात शेअर आणि रोखे बाजारांशी संलग्न असलेल्या या योजनेवर त्यावेळी अनेकांच्या उड्या पडल्या. पुढे जागतिकीकरणामुळे यथावकाश भारतीय अर्थव्यवस्था जगासाठी खुली झाली आणि या क्षेत्रात खासगी कंपन्यांचा शिरकाव झाला. ही पूर्वपीठिका समजून घेतानाच युलिप म्हणजे काय तेही एकदा थोडक्यात समजून घेऊया; म्हणजे ज्यांना हा विमा प्रकार माहिती नाही, त्यांनाही यातले फायदे आणि धोके कळतील. विम्याच्या इतर प्रकारांप्रमाणे या प्रकारातही ठरावीक हप्ता ठरावीक कालावधीप्रमाणे भरावा लागतो. विम्याचे सुरक्षा कवच किती आहे, ते कोणत्या परिस्थितीत किती मिळते, ही माहितीही दिलेली असते.




एक महत्त्वाचा फरक म्हणजे इतर विमा प्रकारांत आपला संपूर्ण हप्ता हा एक रक्कम' म्हणून जमा होतो आणि ही रक्कम वाढत जाते. मात्र युलिपमध्ये आपण भरलेल्या हप्त्यातील काही भाग वेगवेगळ्या प्रकारचे शुल्क म्हणून कापून घेतला जातो आणि उर्वरित रक्कमेतून विशिष्ट प्रकारच्या फंडांची युनिट्स त्या दिवशीच्या बाजारभावाने खरेदी केली जातात. याची स्टेटमेंट विमाधारकाला पाठवली जाते आणि त्यात सर्व तपशील दिलेला असतो. मुख्य म्हणजे हप्त्याची किती रक्कम जमा झाली आणि जमा झालेल्या युनिट्सचे बाजारमूल्य किती आहे तेही कळते. शेअर बाजार खूप वर गेला, पण माझ्या युलिपचे बाजारमूल्य तेवढे वाढले नाही किंवा कमी झाले, असे तुम्हाला वाटत असेल, तर या युनिट्सची गुंतवणूक कशात केली गेली आहे ते समजून घ्यावे लागेल. अथवा त्यासाठी तुम्ही आमच्या कार्यकर्त्यांची मदत घेऊ शकता.

आता आपण एका केसमध्ये तक्रार काय होती आणि तिचे निराकरण कसे केले गेले ते पाहूया. मुंबईतील एका महिलेने बजाज अलियान्झ विमा कंपनीकडून पाच वर्षे मुदतीची युलिप, म्हणजेच बाजाराशी निगडित असलेली विमा पॉलिसी घेतली. तिचा वार्षिक हप्ता रु. पाच लाख इतका होता. त्यासंबंधी तिला पाठवल्या गेलेल्या कागदपत्रांमध्ये एक तक्ता होता, ज्यात किती वर्षांनी किती रक्कम मिळू शकेल ते दिले होते. त्या महिलेने तीन वर्षे हप्ता भरला आणि पाच वर्षांनी पॉलिसीची मुदत पूर्ण झाल्यावर त्या तक्त्यानुसार रु.२५ लाख ४७ हजार मिळण्यासाठी विमा कंपनीकडे अर्ज केला; परंतु कंपनीने तिला फक्त रु.१५ लाख २३ हजार इतकी रक्कम परत केली. सदर महिलेने चौकशी केली असता, कंपनीने नियमानुसार तेव्हढीच रक्कम देय असल्याचे स्पष्ट केले. कंपनीने दिलेल्या तक्त्याप्रमाणे उर्वरित रु. १० लाख, २४ हजार इतकी रक्कम मिळण्यासाठी सदर महिलेने खूप पाठपुरावा केला, विमा कंपनीला रीतसर नोटीसही पाठवली. पण त्याचा उपयोग झाला नाही. त्यामुळे शेवटी तिने नाईलाजाने मुंबई उपनगर अतिरिक्त जिल्हा ग्राहक आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सुनावणी दरम्यान विमा कंपनीच्या वकिलाने सांगितले की, तक्रारदार महिलेने दावा सादर केला त्यावेळी जी रक्कम लागू होती, ती पूर्ण रक्कम तिला देण्यात आली आहे. जी जास्तीची रक्कम मिळावी म्हणून तिची मागणी आहे, त्या रकमेवर तिचा कोणताही हक्क नाही. विमा कंपनीने हेही स्पष्ट केले की सदर महिलेकडे जो तक्ता आहे, तो बनावट आहे आणि त्यावर कंपनीच्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही; परंतु त्या महिलेकडे जी कागदपत्रे होती, त्यानुसार जिल्हा आयोगाने निर्णय दिला की विमा कंपनीने उर्वरित रक्कमही त्या महिलेस अदा करावी. विमा कंपनीला अर्थातच हा निर्णय मान्य झाला नाही आणि तिने महाराष्ट्र राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे अपील दाखल केले. राज्य आयोगाने हे अपील फेटाळून जिल्हा आयोगाचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे विमा कंपनीने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे अपील दाखल केले.

राष्ट्रीय आयोगापुढील सुनावणीमध्ये कंपनीने परत एकदा सांगितले की, ज्या तक्त्याचा आधार घेऊन तक्रारदार अधिक रकमेची मागणी करीत आहे, तो बनावट असून त्या विरोधात मुंबईतील मालाड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. त्यावर तक्रारदाराने सांगितले की, तो तक्ता विमा पॉलिसीचाच एक भाग आहे आणि जेव्हा पॉलिसीची कागदपत्रे मिळाली तेव्हा तो तक्ताही त्यात होता. त्यावर राष्ट्रीय आयोगाने विमा कंपनीला निर्देश दिले की, संबंधित पॉलिसीची संपूर्ण फाईल, आकडेवारी आणि मालाड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीची सद्यस्थिती आयोगापुढे अंतिम सुनावणीच्या दिवशी सादर करावी. त्या दिवशी कंपनीने जी कागदपत्रे आयोगापुढे ठेवली, ती आयोगाने मान्य केली नाहीत. विशेषत: कंपनीने दुसऱ्याच एका विमा धारकाची पॉलिसी कागदपत्रे दिल्याचे आयोगाला आढळून आले. बनावट तक्त्याबद्दल जी फिर्याद कंपनीने मालाड पोलीस ठाण्यात केली होती, तिची कागदपत्रेही कंपनी सादर करू शकली नाही. तिच्या वकिलांनी असे स्पष्टीकरण दिले की, पोलीस ठाण्याने ती फिर्याद आपल्या नोंदीतून काढून टाकली आहे.

अंतिम निर्णय देताना राष्ट्रीय आयोगाने असेही निरीक्षण नोंदवले की, ही केस सुनावणीसाठी येईपर्यंत आपण पोलीस ठाण्यात केलेल्या फिर्यादीचे काय झाले, ते जाणून घेण्याची तसदीही कंपनीने घेतलेली दिसत नाही, तसा कोणताही पत्रव्यवहार केल्याचेही दिसून येत नाही. या सर्व बाबींचा विचार करून राष्ट्रीय आयोगाने विमा कंपनीचे अपील फेटाळून लावले आणि उर्वरित रु. १० लाख २४ हजार रुपयांची रक्कम तक्रारदारास देण्याचा आदेश दिला.

वाचकहो, यातून हा बोध घेतला पाहिजे की, आपण विमा पॉलिसी विकत घेणे किंवा तत्सम कोणतेही आर्थिक व्यवहार जेव्हा करतो, तेव्हा त्यातील अटी व शर्ती डोळ्यांत तेल घालून समजून घ्यायला हव्यात. केवळ समोरचा सांगतोय म्हणून त्यावर विश्वास ठेवू नये. म्हणूनच सुरुवातीला सांगितले की, तुम्हाला अशा प्रकारच्या कोणत्याही अडचणी असतील किंवा शंका असतील, तर आधी त्याचे परिणाम काय होऊ शकतात, त्याबद्दल आमच्या कार्यकर्त्यांकडून विनामूल्य मार्गदर्शन घ्यावे.

# त्वचेचे सौंदर्य वाढवण्यासाठी मुलतानी माती लावताय मग थांबा! 'या' त्वचेचे होऊ शकते नुकसान

सर्वच महिलांना सुंदर आणि चमकदार त्वचा हवी असते. त्वचेचे आरोग्य चांगले राहण्यासाठी शरीराला आतून पोषण देणे आवश्यक आहे. यासाठी आहारात बदल करून शरीराला आवश्यक असलेल्या भाज्या, फळे, ड्रायफ्रुट इत्यादींचे सेवन केल्याने आरोग्य सुधारण्यास मदत होते.त्वचेचा रंग सुधारण्यासाठी आणि चेहऱ्यावर आलेले डाग आणि पुरळ घालवण्यासाठी अनेक महिला मुलतानी मातीचा वापर करतात. मागील अनेक वर्षांपासून मुलतानी मातीचा वापर त्वचेचा रंग आणि पोत सुधारण्यासाठी केला जात आहे. मुलतानी माती लावल्यामुळे त्वचा ग्लोइंगच नाहीतर मऊ चमकदार सुद्धा दिसते. चेहऱ्यावरील डार्क स्पॉट कमी होतात.

नैसर्गिक उपाय म्हणून मुलतानी मातीचा वापर केला जातो. चेहऱ्यावर आलेले काळे डाग, पिगमेंटेशन कमी करण्यासाठी मुलतानी मातीचा वापर केला जातो. मुलतानी मातीमध्ये जास्त



प्रमाणात मिनरल्स आढळून येतात, जे त्वचा रंग आणि पोत सुधारण्यासाठी मदत करतात. पण अतिप्रमाणात मुलतानी मातीचा वापर त्वचेवर केल्यानंतर त्वचा खराब होण्याची शक्यता असते. मुलतानी माती लावल्यामुळे चेहऱ्याचे नुकसान होते. पण आज तुम्हाला कोणत्या त्वचा प्रकारावर मुलतानी माती लावल्यास चेहऱ्याचे नुकसान होऊ शकते, याबद्दल सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.'या' लोकांनी मुलतानी मातीचा वापर करू नये:

कोरडी त्वचा असलेल्या महिलांनी चेहऱ्यावर मुलतानी माती लावू नये. मुलतानी माती लावल्यामुळे त्वचेमधील ओलावा कमी होईल त्वचा अधिक कोरडी पडेल. मुलतानी मातीमध्ये असलेले मिनरल्स आणि ॲल्युमिनियम सिलिकेट त्वचेमधील पाणी पूर्णपणे शोषून घेते. त्यामुळे कोरडी त्वचा असलेल्या महिलांनी चेहऱ्यावर मुलतानी माती लावू नये.

संवेदनशील त्वचा:

जर तुमची त्वचा अतिशय नाजूक किंवा संवेदनशील असेल तर मुलतानी माती लावू नये. यामुळे चेहऱ्यावर जळजळ किंवा लाल डाग येण्याची शक्यता असते. मुलतानी माती लावल्यामुळे त्वचा खेचली जाते. यामुळे तुमचा चेहरा काळा पडू शकतो. अनेक महिला मुलतानी मातीचा लेप बनवून चेहऱ्यावर अधिक वेळ लावून तसाच ठेवतात. यामुळे चेहऱ्यावर लवकर सुरकुत्या पडण्याची शक्यता असते.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

## तुम्हीही रात्री डोक्याखाली जाड उशी घेऊन झोपता का? त्वचा आणि पाठीच्या कण्यावर होऊ शकतो गंभीर परिणाम

झोपताना जास्तीत जास्त लोक डोक्याखाली उशी घेतात. काही लोकांना उशीशिवाय झोपच येत नाही. पण, असं करणं आरोग्यासाठी किती नुकसानकारक असतं हे अनेकांना माहीत नसतं. प्रत्येकाच्या झोपण्याच्या सवयी वेगळ्या असतात. काहींना शरीर सरळ रेषेत ठेवून झोपायची सवय असते, तर काही जण आडवे–तिडवे झोपतात, काहींना उशी लागते, तर काही विनाउशीचे झोपतात. खरंतर उशी घेऊन झोपणं शरीरासाठी योग्य नाही, असं म्हटलं जातं. यासंदर्भात जनरल मेडिसिन, सल्लागार फिजिशियन डॉ. पॅलेटी सिवा कार्तिक रेड्डी यांनी सविस्तर माहिती दिली आहे. कंटेन्ट क्रिएटर डॉ. मेहस यांच्या मते, उशीचा सतत वापर केल्याने त्वचेवर सुरकुत्या पडू शकतात. कारण उशीमुळे चेहऱ्यावर दबाव पडतो. जे लोक उशीचा वापर करत नाहीत, त्यांना ही समस्या होत नाही. उशी न वापरल्याने पिंपल्स येण्याची समस्याही कमी होते. कारण उशीचे कव्हर नेहमी धुतले जात नाहीत, त्यामुळे त्यातील धूळ–कण यामुळे चेहऱ्यावर पिंपल्स येतात. यावेळी डॉ. वापरामुळे त्वचेला कोरडेपणा, संक्रमण होण्याची अधिक शक्यता असते. डॉ. रेड्डी खालील शिफारस करतात की, अशी उशी निवडा जी मानेच्या मणक्यावरील ताण कमी करेल. तरीही जर मानेच्या वेदना कायम राहिल्यास डॉक्टरांकडे जाणे फायदेशीर आहे. डॉक्टर रेड्डी सांगतात, अपुऱ्या पद्धतीच्या उशीचा आधार एखाद्या व्यक्तीच्या मणक्यावर गंभीर परिणाम करू शकतो. ही झीज होऊन मानेच्या डिस्क्स आणि सांध्यांवर परिणाम होतो, ज्यामुळे वेदना होतात. उंच उशीचा वापर केल्याने मणक्याची झीज वाढू शकते, ज्यामुळे स्पॉन्डिलेसिस होण्याचा धोका वाढतो. उंच उशीच्या वापरामुळे सतत मानदुखी, डोकेदुखी आणि खांदेदुखी हा रोजचा त्रास उद्भवू शकतो; यामुळे झोपेमध्ये व्यत्यय, मूडवर परिणाम होऊ शकतो. उशी निवडताना महत्त्वाचा घटक डॉ. रेड्डी यांच्या म्हणण्यानुसार, उशीचे प्राथमिक कार्य म्हणजे मानेच्या नैसर्गिक वक्रला आधार देणे. डोके आणि मान तटस्थ स्थितीत ठेवणाऱ्या उशा शोधा. मोठ्या उशीचा



मेहस यांनी एक व्हिडीओ शेअर करत आपण उशीचा वापर चुकीच्या पद्धतीने कसा करतो हे दाखवलं आहे.उंच उशीसह झोपणे त्वचेच्या समस्या वाढवते  जनरल मेडिसिन, सल्लागार फिजिशियन डॉ. पॅलेटी सिवा कार्तिक रेड्डी यांनी उंच उशीवर झोपल्यास तुमच्या त्वचेवर काय परिणाम होऊ शकतो हे स्पष्ट केले आहे. उंच उशी घेतल्यानं सर्वात पहिला आजार म्हणजे मानेचा त्रास. उशी घेतल्याने मानदुखी सतत चालू राहते. यासाठी तुम्ही नेहमी लहान उशी अथवा अत्यंत मऊ उशीचा वापर करावा. तसेच उशीमुळे रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होऊ शकतो. डॉ. रेड्डी पुढे सांगतात, सतत उशीच्या परिणाम हा मेंदूतील रक्तप्रवाहावरही होतो, त्यामुळे ही सवय तुम्ही त्वरीत सोडावी. जाडसर उशीवर झोपल्यामुळे मेंदूपर्यंत नीट रक्तपुरवठा होत नाही आणि त्यामुळे केसांनाही योग्य पोषण मिळत नाही; यामुळे केसगळतीचे प्रमाणही वाढते आणि त्याशिवाय त्वचाही खराब झालेली दिसून येते. जर उशी बरोबर नसेल तर तुम्हाला डिस्टर्ब स्लीपची समस्या होऊ शकते. जर तुम्ही उशीचा वापर करत नसाल तर तुम्हाला चांगली झोप येऊ शकते, ज्यामुळे तुमचा सर्व थकवा दूर होतो, तणाव कमी होतो. अर्थातच तणाव आणि थकवा तुम्हाला नसेल तर मानसिक आरोग्य चांगलं राहतं.

## थायरॉईडच्या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी आहारात करा 'या' हर्बल ड्रिंकचा समावेश

चुकीच्या जीवनशैली, खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी, सतत बाहरेच्या पदार्थांचे सेवन, अपुरी झोप इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो.थायरॉईडचा त्रास जाणवू लागल्यानंतर महिलांमध्ये अनेक बदल होऊ लागतात. थकवा, मूड स्विंग्स, वजन वाढणे, केस गळणे, मासिक पाळीत अनियमितता इत्यादी अनेक समस्या जाणवू लागतात. तसेच थायरॉईडचा त्रास असलेल्या महिलांना गरोदरपणात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

थायरॉईड हा सामान्य आजार असून सर्वच महिला या आजाराने त्रस्त आहेत. चुकीच्या जीवनशैली, खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी, सतत बाहरेच्या पदार्थांचे सेवन, अपुरी झोप इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो.थायरॉईडचा त्रास जाणवू लागल्यानंतर महिलांमध्ये अनेक बदल होऊ लागतात. थकवा, मूड स्विंग्स, वजन वाढणे, केस गळणे, मासिक पाळीत अनियमितता इत्यादी अनेक समस्या जाणवू लागतात. तसेच थायरॉईडचा त्रास असलेल्या महिलांना गरोदरपणात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळेच आज आम्ही तुम्हाला थायरॉईडपासून कायमची सुटका मिळवण्यासाठी आहारात कोणत्या ड्रिंकचा समावेश करावा, याबद्दल सांगणार आहोत. हे ड्रिंक प्यायल्याने थायरॉईड कमी होण्यास मदत होईल.



कृती:

हर्बल ड्रिंक बनवण्यासाठी सर्वप्रथम एका टोपात एक ते दीड ग्लास पाणी ठेवून त्यात आल्याचा अर्धा तुकडा टाकावा.

त्यानंतर त्यात दालचिनी, जिरे, जायफळ आणि मुळेथी टाकून पाणी उकळण्यासाठी ठेवा.

१० मिनिटं पाणी व्यवस्थित उकळवून झाल्यानंतर गॅस बंद करून घ्या.

त्यानंतर ते पाणी गाळून त्यात लिंबाचा रस आणि चिमूटभर हळद टाकून मिक्स करून प्या.

थायरॉईड नियंत्रणात ठेवण्यासाठी हर्बल ड्रिंक

थायरॉईड नियंत्रणात ठेवण्यासाठी हर्बल ड्रिंक

हळदीचे दूध:

थायरॉईडच्या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी हळदीचे दूध प्यावे. हळदीच्या दुधामध्ये असलेले गुणधर्म थायरॉईड रुग्णांसाठी प्रभावी आहेत. रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास दुधात चिमूटभर हळद टाकून नियमित हे दूध प्यावे.

सुर्यफुलाच्या बिया:

सुर्यफुलाच्या बियांचे सेवन केल्यामुळे हर्मिनल संतुलित राहतात. सूर्यफुलाच्या बियांमध्ये कमी कॅलरी आणि सेलेनियम जास्त असते. तसेच थायरॉईड असलेल्या रुग्णांनी तीळाचे सेवन करावे.

## काळे मीठ आरोग्यासाठी ठरू शकते घातक, जाणून घ्या दुष्परिणाम

जेवणाची चव वाढवण्यासाठी रोजच्या आहारात मीठाचा वापर केला जातो. जेवणात मीठ नसेल तर जेवणाची चवच लागणार नाही. पांढऱ्या मीठासोबत रोजच्या आहारात काळ्या मीठाचा सुद्धा समावेश करावा. काळे मीठ खाल्ल्याने मधुमेह, अपचन इत्यादी अनेक आजारांपासून शरीराचे होणारे नुकसान टाळता येते. काळे मीठ आरोग्यसाठी जितके चांगले आहे तेवढेच काळ्या मीठाचे आरोग्यावर दुष्परिणाम सुद्धा दिसून येतात.



पदार्थाची चव वाढवण्यासाठी मीठाचा वापर केला जातो. मिठाशिवाय जेवणाला चवच लागत नाही. जेवणात जर मीठ टाकले नाहीतर जेवण बेचव लागते.अनेक घरांमध्ये घरगुती वापरातील मीठासोबतच काळे मीठ सुद्धा उपलब्ध असते. काळ्या मिठाचा वापर सरबत किंवा इतर पदार्थ बनवण्यासाठी केला जातो. पांढऱ्या मीठासोबतच काळे मीठ सुद्धा आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. जेवणात काळ्या मिठाचे सेवन केल्याने आरोग्यसंबंधित अनेक समस्या दूर होण्यास मदत होते. काळ्या मीठामध्ये अँटीऑक्सिडेंट गुणधर्म असतात, ज्यामुळे शरीराला आलेली सूज कमी होऊन वेदनांपासून सुटका मिळते. आज आम्ही तुम्हाला काळे मीठ खाल्ल्याने आरोग्याला नेमके काय फायदे आणि तोटे होतात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.(फोटो सौजन्य–ळीींलज्ञ)

काळ्या मीठाचे सेवन केल्याने आरोग्याला होणारे फायदे:

सिडिटीची समस्या दूर होते:

सिडिटी किंवा पोटासंबंधित इतर आजार असलेल्या व्यक्तींनी काळ्या मीठाचा आहारात समावेश करावा. काळे मीठ आरोग्यासाठी गुणकारी ठरेल. बद्धकोष्ठतेचा त्रास जाणवू लागल्यानंतर काळ्या मीठाचे सेवन करावे.

मधुमेहासाठी गुणकारी:

रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यासाठी काळ्या मिठाचे सेवन करावे. यामुळे रक्तातील साखर नियंत्रणात राहते. हृद्यासंबंधित समस्या जाणवू लागल्यानंतर काळ्या मीठाचे सेवन करावे.

पचनक्रिया सुधारते:

जेवणामध्ये काळ्या मीठाचा समावेश केल्यास पचनक्रिया सुधारून आरोग्याला अनेक फायदे होतात. पचनक्रिया बिघडल्यानंतर आरोग्य पूर्णपणे बिघडून जाते. त्यामुळे खाण्यापिण्याच्या पदार्थांमध्ये पांढऱ्या मीठाचा समावेश न करतात काळ्या मीठाचा समावेश करावा.

काळ्या मीठाचे आरोग्याला होणारे तोटे:

अनेकांना काळ्या मीठाचे सेवन केल्याने फक्त फायदेच होतात, असे वाटते. पण असे नाही. अतिप्रमाणात काळ्या मीठाचे सेवन केल्याने आरोग्याला तोटे सुद्धा होतात. काळ्या मीठाच्या अति सेवनामुळे किडनीचे आजार होण्याची शक्यता असते. जास्त प्रमाणात मीठ खाल्ल्याने शरीरात सोडियमची पातळी वाढत जाते. काळ्या मिठामध्ये फ्लोराईड आणि इतर रसायने आढळून येतात, जी आरोग्यासाठी हानिकारक आहेत. त्यामुळे उच्च रक्तदाबाच्या समस्येने त्रस्त असलेल्या लोकांनी काळ्या मीठाचे सेवन करू नये. काळ्या मीठात आयोडीन नसते, त्यामुळे थायरॉईडचा धोका वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे रोजच्या वापरात कमीत कमी काळ्या मिठाचे सेवन करावे. या मीठाच्या अतिसेवनामुळे मूत्रपिंडात दगड तयार होऊ शकतात. याचा परिणाम पचनक्रियेवर दिसून येतो.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

## नागपंचमीच्या सणाला बनवा पौष्टिक चवदार गव्हाची खीर, वाचा सोपी रेसिपी

श्रावणातील पहिला सण म्हणजे नागपंचमी. यंदाच्या वर्षी ९ ऑगस्टला नागपंचमी आहे. नागपंचमीच्या दिवशी नागाची पूजा करून नैवेद्य दाखवला जातो. तसेच अनेक महिला उपवास सुद्धा करतात. श्रावण महिना सुरु झाल्यानंतर सगळीकडे एक वेगळीच लगबग असते. सर्व महिला नटूनथटून श्रावणातील प्रत्येक सोमवारी शिव मूठ वाहण्यासाठी शंकराच्या मंदिरात जातात. तसेच नागपंचमीच्या दिवशी पुरणाचे दिंड, गव्हाची खीर, पातोळ्या इत्यादी गोडाचे अनेक पदार्थ बनवले जातात. बदलत्या ऋतूनुसार आहारात सुद्धा बदल केला जातो. दरवर्षी नागपंचमीच्या दिवशी गव्हाची खीर बनवली जाते. गव्हाची खीर हा पारंपरिक पदार्थ असून गाव खेड्यात सर्वच ठिकाणी बनवला जातो. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये गव्हाची खीर कशी बनवायची याची रेसिपी सांगणार आहोत. यंदाच्या नागपंचमीला गव्हाची खीर नक्की बनवून पहा.(फोटो सौजन्य–ळीींलज्ञ)

साहित्य:

एक वाटी गहू

दूध

वेलची पावडर

काजू, बदाम

मनुका

गूळ

तूप

कृती:

गव्हाची खीर बनवण्यासाठी सर्वप्रथम गहू पाखडून स्वच्छ करून घ्या. त्यानंतर रात्रभर पाण्यात गहू भिजत ठेवा.

रात्रभर गहू भिजवून ठेवल्यानंतर कुकरमध्ये गहू टाकून त्यात ३ ग्लास पाणी टाकून ७ ते ८ शिट्ट्या काढून घ्या.

गहू व्यवस्थित शिजल्यानंतर ते





मिक्सरमधून बारीक करून घ्या किंवा रवीच्या सहाय्याने फेटून घ्या.

त्यानंतर कढईमध्ये ४ ते ५ चमचे तूप टाकून गरम करून घ्या. गरम तुपात सुका मेवा परतून घ्या.

नंतर त्यात बारीक करून घेतलेले गहू टाकून व्यवस्थित शिजवून घ्या. गहू शिजल्यानंतर त्यात अर्धा वाटी गूळ टाकून मिक्स करा.

गूळ व्यवस्थित मिक्स करून झाल्यानंतर त्यात वेलची पावडर आणि काजू बदाम टाकून पुन्हा एकदा मिक्स करा.

खीर शिजताना पाणी टाका. पाणी टाकून खीर व्यवस्थित शिजल्यावर गॅस बंद करून घ्या.

खीर थंड झाल्यानंतर त्यात दूध घालून मिक्स करा.

# देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न पंतप्रधान मोदीजी पूर्ण करतील – माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर–गेल्या दहा वर्षामध्ये केलेल्या विकासकामावर राज्याचा आणि देशाचा चौफेर विकास केल्यामुळे देशाचे भाग्यविधाते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसर्यांदा पंतप्रधान पदावर विराजमान होण्याचा मान देशातील १४० कोटी जनतेने दिला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन व्यक्त करून यापुढील कालावधीतही देशाचा आणि राज्याचा चौफेर विकास होऊन अठराव्या शतकात स्वामी विवेकानंदांनी केलेली भविष्यवाणी खरी ठरेल आणि २१ व्या शतकात भारत महासत्ता बनून जगाचे नेतृत्व करेल अन् ते स्वप्न देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी पूर्ण करतील असा विश्वास भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला. यावेळी ते लातूर जिल्हा विस्तारीत कार्यकारिणीच्या पार्वती मंगल कार्यालय, लातूर येथील बैठकीत बोलत होते. यावेळी या बैठकीला राज्याचे माजी कामगार कल्याण मंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर, विधान परिषदेचे सदस्य आ.रमेशअप्पा कराड, माजी आ.गोविंद केंद्रे, माजी आ.बब्रूवान खंदाडे, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, भाजयुमोच्या प्रदेश प्रवक्त्या प्रेरणाताई होणराव,माजी शहर जिल्हाध्यक्ष गुरूनाथ मगे, शिरीष कुलकर्णी, भारत चामे, प्रमोद गुडे, भाजपा युमोचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड.गणेश गोमचाळे, राहुल केंद्रे, ॲड.




संभाजीराव पाटील, ॲड.दिग्विजय काथवटे, गोपाळ वांगे, प्रमोद गुडे, ग्रामीण महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष उत्तराताई कलबूर्गे, शहर जिल्हा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष रागिणीताई यादव आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना माजी आ.कव्हेकर म्हणाले की, लातूरच्या सत्ताधार्यांकडे साडेआठ वर्षे मुख्यमंत्री व २३ वर्ष मंत्रीपद असूनही त्यांनी लातूरमध्ये एकही उद्योग आणण्याचे काम केलेले नाही. फक्त त्यांनी लातूरचा महानायक बनून स्वतःच्या कुटुंबाचा विकास करण्याचे काम केले आहे. पूर्वी त्यांच्या गाडी नव्हती त्यानंतर त्यांनी हरिश्चंद्र रेड्डी यांची गाडी घेतली. परंतु आता त्यांच्याकडे स्वतःचे विमान आहे, ते कुठून आले असा सवाल माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी उपस्थित करीत लातूरचे आ.अमित देशमुख यांनीही विधानसभा निवडणूकीमध्ये निवडून आल्यास दोन महिण्यात ऊजनीचे पाणी लातूरला आणू अन्यथा आहे त्या पदाचा राजीनामा देऊ असे आश्वासन दिले होते, परंतु अद्यापपर्यंत एक थेंबभरही पाणी त्यांनी लातूरला आणले नाही आणि आहे त्या पदाचा राजीनामाही दिला नाही. त्यामुळे लातूरच्या विकासासाठी आपण भाजपाच्या पाठीशी सक्षमपणे उभे रहा लातूरला चंदिगढ बनविण्याचे काम आपण सर्वांना सोबत घेऊन करू असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारत मातेच्या प्रतिमेसह इतर प्रतिमांचे पूजन व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रामाच्या सुरुवातील माजी आ.कै.टी.पी.कांबळे व उदगीरचे कार्यकर्ते सुनिल बोथीकर यांना आदरांजली वाहण्यात आली. तसेच प्रारंभी माजी आ.गोविंद केंद्रे, ॲड.दिग्विजय काथवटे, भाजपा प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, ॲड.संभाजीराव पाटील, माजी खा.सुनिल गायकवाड, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख आदींनी मनोगत व्यक्त केले. तसेच राज्याच्या माजी ग्रामविकास मंत्री तथा विद्यमान खा.पंकजाताई मुंडे यांच्या निवडीबद्दल अभिनंदनाचा ठरावही एकमताने घेण्यात आला. यावेळी या बैठकीला पक्षाचे सर्व पदाधिकारी, सर्व मंडलाध्यक्ष व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दलित हत्याकांडांविरुद्ध लातुरात दुसऱ्या दिवशीही पडत्या पावसात भीम सैनिकांचे 'जबाब दो' धरणे आंदोलन सुरूच



लातूर : गेल्या दीड –दोन महिन्याच्या कालावधीत लातूर शहर व जिल्ह्यात दलित समाजातील तीन तरुणाचा खून केल्याच्या विविध ठिकाणी घटना घडल्या. तर एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिची क्रूरपने हत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. तसेच दोन दलित तरुणांवरील अत्याचाराच्या संतापजनक घटना घडल्या आहेत. या सर्व घटना जातीय मानसिकतेतून घडवण्यात आल्या आहेत. या प्रकरणातील आरोपीवर खुनाचे गुन्हे दाखल करून ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करावेत, सीआयडी मार्फत चौकशी करावी. तसेच आरोपीना तात्काळ अटक सदर खटले फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपीना फाशीची शिक्षा देण्यात यावी. या मागण्यासाठी ६ ते ८ ऑगस्ट दरम्यान लातूर शहरातील महात्मा गांधी चौकात समग्र भीम सैनिकांच्या वतीने सरकार व पोलिसांच्या दिरंगाई विरोधात जबाब दो धरणे करण्यात येत आहे. या आंदोलनाचा आज दुसरा दिवस असून या आंदोलनात मोठ्या संख्येने भीमसैनिक महिला, पुरुष व तरुणाचा सहभाग होता.

लातूर शहरातील जेएसपीएम शिक्षण संस्थेच्या वसतिगृहात शिकणाऱ्या परळी येथील १३ वर्षीय अरविंद खोपे नामक विद्यार्थ्यांचा संशयात्मक मृत्यू झाला आहे. त्या आधी चाकूर तालुक्यातील नायगाव येथील कु. सायली गायकवाड या १५ वर्षीय दलित विद्यार्थिनीचा लातूरच्या एका वसतिगृहात बलात्कार करून तिचा निर्घृणपने खून करण्यात आला. या शिवाय औसा तालुक्यातील भुसनी येथील आकाश सातपुते या दलित तरुणाची हत्या करण्यात आली. तसेच देवणी येथील सचिन सूर्यवंशी या तरुणाची हत्या केली. तसेच गांजूर दलित अत्याचार प्रकरणातील दलित कार्यकर्त्यांवरील ३५३ सारखे खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घटनामुळे संपूर्ण दलित समाज व आंबेडकर प्रेमी जनतेमध्ये रोष व्यक्त करण्यात येत आहे.

# लातूरचे रविंद्र बनकर रोटरी प्रांत ३१३२ चे सर्वोत्कष्ट अध्यक्ष

लातूर/प्रतिनिधी : प्रांतपाल स्वाती हेरकळ यांनी आयोजित केलेल्या रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या समारंभात रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे माजी अध्यक्ष रविंद्र बनकर यांची वर्ष २०२३–२४ चा बेस्ट प्रेसिडेंट म्हणून निवड करून त्यांना सन्मानित करण्यात आले.



सोलापूर,सातारा, अहमदनगर,छ. संभाजीनगर,लातूर, धाराशिव,बीड,जालना, नांदेड,हिंगोली व परभणी जिल्हाचा समवेश असलेल्या रोटरी प्रांता मधील ९५ रोटरी क्लब मधून ही निवड झाली आहे.

रविंद्र बनकर यांनी परिवर्तन प्रकल्प,क्लब प्रशासकीय कार्य,ग्लोबल ग्रँट प्रकल्प,मेंबरशीप, इंटरनॅशनल सर्व्हिस, सर्व्हिस प्रकल्प,युथ सर्व्हिस आदी क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना हा सन्मान देण्यात आला. त्यांच्या नेतृत्वात क्लबने अनेक सामाजिक उपक्रम राबवले व उत्कृष्ट कार्य केले आहे.

या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्रांतपाल रवि वदलामणी उपस्थित होते.रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनला पारिवर्तन क्लब अवार्डसह विविध पुरस्कार मिळाले.

रविंद्र बनकर यांच्या नेतृत्वाखाली क्लबने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून त्यांना मिळालेला सन्मान निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी रोटरी प्रांत ३१३२ मधील रोटरी सदस्य व नागरिकांनी शुभेच्छा दिल्या.

## बच्चू कडू यांनी जिभेला लगाम घालावा अन्यथा परिनामास सामोरे जावे मा.शिवसेना तालुका प्रमुख बाबुराव शेळके



लातूर. आमदार बच्चू कडू यांनी महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांना समुद्रात फेकून देऊ असे विधान नुकतेच बच्चु कडू यांनी केले होते.त्याचा निषेध करत यांच्या बद्दल केलेले विधान हे बच्चू कडू यांची लायकी दाखवणारे असून बच्चू कडू यांनी आपल्या अवकातीत राहून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या बद्दल बोलावे अन्यथा शिवसेना त्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही असा इशारा मा.शिवसेना तालुका प्रमुख बाबुराव शेळके यांनी दिला आहे. बच्चू कडू यांनी आपल्या लायकित राहून राहून बोलावे मीच महाराष्ट्रात भारी आहे हे खूळ डोक्यातून काडून टाकावे व विचार करून बोलावे .शिवसेनेचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्याबद्दल पुन्हा असे विधान केल्यास महाराष्ट्रातील शिवसैनिक रस्त्यावर फिरू देणार नाहीत हे लक्षात ठेवावे.असा सज्जड दमही बच्चू कडू यांना बाबुराव शेळके यांनी दिला आहे.

# श्री गुरु शंभुलिंग शिवाचार्य महाराजांच्या श्रावणमास तपोनुष्ठानास प्रारंभ

लातूर : अंबाजोगाई मठ संस्थांचे श्री गुरु शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांचे २९ वे श्रावणमास अनुष्ठान , इष्टलिंग महापूजा व आशिर्वचन सोहळ्यास लातूर येथील वीरशैव सांस्कृतिक भवन मध्ये उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला आहे.

प्रतिवर्षी श्रावणमासाचे औचित्य साधून श्री गुरु शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांचे अनुष्ठान , इष्टलिंग महापूजा व आशिर्वचन सोहळा विविध ठिकाणी पार पडतो. यावर्षी हा सोहळा लातूर शहरातील वीरशैव सांस्कृतिक भवन मध्ये होत आहे. दि. ५ ऑगस्ट ते दि. १ सप्टेंबर २०२४ या कालावधीत दररोज सकाळी ८ ते १० इष्टलिंग दांपत्य महापूजा व आशीर्वचन, सकाळी ११ ते १२ : ३० दांपत्य पूजा व अन्नदान करणाऱ्यांचा प्रसाद, दुपारी १ ते ४ महिला भजनी मंडळाचे शिवभजन व हरिपाठ, दुपारी ४ ते ५ किर्तन , सायंकाळी ५ ते ७ श्री गुरु शंभुलिंग शिवाचार्य महाराजांचे प्रवचन, दि. १६ ऑगस्ट रोजी शंभुलिंग शिवाचार्य महाराजांचा जन्मोत्सव, दि. १ सप्टेंबर अनुष्ठान समाप्ती व गुरुवर्यांचा सन्मान असे विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

लातूर शहर व परिसरातील भाविक भक्तांनी या धार्मिक सोहळ्याचा आवर्जून लाभ घ्यावा असे आवाहन एड. सांबप्पा गिरवलकर, विश्वनाथ निगुडगे, चंद्रशेखर बुरांडे, रामलिंग काळे, राजकुमार कत्ते, उमाकांत कोरे, महादेवप्पा लामतुरे, सुनील भिमपुरे , एड. योगीराज कल्याणे , सोमेश्वर ईश्वरशेटे , विक्रम महाजन, शरणप्पा कलेमले , बंडू स्वामी यांसह समस्त वीरशैव लिंगायत बांधव व महिला मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# आर्वी गायरान पुंनर्वासित वस्तीत नागरी सुविधासाठी लातूर मनपा समोर नागरिकांचे आमरण उपोषण

**: रिपाई आठवले पक्षाचे नेते चंद्रकांत चिकटे यांनी घेतली उपोषणार्थिंची भेट**



लातूर : लातूर शहरालगत असलेल्या आर्वी गायरान या पुनर्वसित वस्तीत सन २००६ पासून लातूर मनपा किंवा आर्वी ग्रामपंचायतने कुठल्या प्रकारच्या मूलभूत नागरी सुविधा पुरवलेल्या नाहीत. त्यामुळे येथील नागरिकांचे जगणे मुश्किल झाले आहे. रस्ते, नाल्या, विज शौचालय, सार्वजनिक स्म्शानभूमी असे काहीच नाही. येथील गरिबांची घरे पडायला आली आहेत. येथील सर्व नागरिक रोजी मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मनपाने जो रस्ता बांधून दिला त्यावर देखील अतिक्रमण करण्यात आले आहे. त्यामुळे आर्वी गायरान वस्तीत मनपाने सर्व मूलभूत नागरी सुविधा तात्काळ पुरवाव्यात या मागणीसाठी या वस्तीतील नितीन झोम्बडे व महिला पुरुष नागरिक मागील तीन दिवसापासून लातूर महानगरपालिके समोर आमरण उपोषण करत आहेत. आज दुपारी रिपाई आठवले पक्षाचे नेते माजी नगरसेवक चंद्रकांत चिकटे यांनी सदर उपोषणार्थिंची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच आर्वी गायरान वस्तीत लाईटची सोय करण्याबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांना फोन करून प्रक्रिया सुरु केली आहे. तसेच येथील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी मी आपल्या सोबत असल्याची त्यांनी ग्वाही दिली.

# वडिलोपार्जित संपत्तीच्या वाटणीचा वाद सुटणार अवघ्या ५ हजारात!

लखनौ : वृत्तसंस्था उत्तर प्रदेशच्या योगी सरकारने कौटुंबिक संपत्तीच्या वाटणीबाबत मोठा निर्णय लागू केला आहे. वडिलोपार्जित संपत्तीच्या वाटणीबाबत भागधारकांमध्ये आता कोणताही वाद होणार नाही. ज्यांच्यात वारसा संपत्तीवरून गेली कित्येक वर्ष वाद सुरू आहेत त्यांना सरकारने मोठा दिलासा दिला आहे. केवळ ५ हजार रुपयांत हे वाद सोडवले जाणार आहेत.

दरम्यान, योगी सरकारच्या या निर्णयामुळे लाखो कुटुंबांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे संपत्तीच्या वाटणीतील वाद कमी होण्याची अपेक्षा आहे. याआधी यूपीत व्यवसाय करणा–यांना ईज ऑफ डुईंग बिझनेस अंतर्गत सुलभपणे व्यवसाय करता यावा यासाठी अनेक पाऊले सरकारकडून उचलली गेली. ईज ऑफ लिविंग अंतर्गत महसूल विभागात स्टॅम्प ड्युटीवर सवलत देत हा निर्णय घेतला आहे.



उत्तर प्रदेशात वार्षिक जवळपास ४० लाख रजिस्ट्री केली जाते. रजिस्ट्री आणि संपत्ती वाटणीत कायम वाद उभे राहतात. त्यावर काही तोडगा काढत कौटुंबिक संपत्तीची वाटणी आणि संपत्ती नातेवाईकांच्या नावे करणे यावर यापुढे ५ हजार रुपये स्टॅम्प ड्युटी निश्चित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी हे आदेश दिले आहेत. रक्ताच्या नातेवाइकांच्या नावे असलेल्या मालमत्तेला यापूर्वी सरकारने मोठा दिलासा दिला होता.

उत्तर प्रदेशात वडिलोपार्जित संपत्तीच्या वाटणीबाबत तहसिलमध्ये कौटुंबिक रजिस्टर बनते. ज्यात संपत्तीतील सर्व भागधारकांची नावे असतात. त्यानंतर तहसिलदारासमक्ष सहमती पत्र दिले जाते. याला दिर्घकाळ जातो. दुस–या प्रक्रियेत भागधारक कोर्टात जातात. कोर्ट प्रकरणात कित्येक वर्ष निघून जातात. तिस–या प्रक्रियेत वडिलोपार्जित संपत्तीचे सर्व भागधारक एकत्रित येतात आणि सहमती पत्र देतात.

# मांजरा धरणाचा पाणी साठा २.३२ टक्क्यांवरच



लातूर : प्रतिनिधी लातूर शहराठी महत्वपूर्ण असलेल्या मांजरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात आतापर्यंत जोरदार पाऊस पडलेला नसल्यामुळे पावसाळ्याचे अडीच महिने संपत आले तरी मांजरा धरणाच्या पाणीपातळीत वाढ झालेली नाही. दि. ७ ऑगस्ट रोजी मांजरा धरणाचा पाणीसाठा २.३२ टक्क्यांवरच आहे. मांजरा धरणातील उपयुक्त पाणीसाठ्यात वाढ होण्याकरीता मोठ्य पावसाची आवश्यकता आहे.

केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरणात एकुण पाणीसाठा ५१.२२७० दशलक्ष घनमीटर एवढा आहे. ४७.१३० दशलक्ष घनमीटर मृत पाणीसाठा आहे. उपयुक्त पाणीसाठा ४.०९७ दशलक्ष घनमीटर असून उपयुक्त पाणीसाठ्याची टक्केवारी २.३२ एवढी आहे. लोहारा तालुक्यातील माकणी येथील निम्न तेरणा धरणात एकुण पाणीसाठा ५६.७५२० दशलक्ष घनमीटर आहे. मृत पाणीसाठा २९.९६७ दशलक्ष घनमीटर आहे. उपयुक्त पाणीसाठा २६.७८५ दशलक्ष घनमीटर असून उपयुक्त पाण्याची टक्केवारी २९.३६ इतकी आहे. जिल्ह्यातील आठ मध्यम प्रकल्पांत एकुण पाणीसाठा ४७.७०३ दशलक्ष घनमीटर आहे. मृत पाणीसाठा १७.६८२ दशलक्ष घनमीटर आहे. उपयुक्त पाणीसाठा ३००२१ दशलक्ष घनमीटर असून उपयुक्त पाण्याची टक्केवारी २४.५८ इतकी आहे. १३४ लघु प्रकल्पात एकुण पाणीसाठा १२६.२०२ दशलक्ष घनमीटर आहे. उपयुक्त पाणीसाठा ९५.६७६ दशलक्ष घनमीटर असून उपयुक्त पाण्याची टक्केवारी ३०.४४ इतकी आहे. जिल्ह्यातील एकुण १४४ प्रकल्पांत एकुण पाणीसाठा २८१.८८५ दशलक्ष घनमीटर आहे. मृत पाणीसाठा .९४.७८ दशलक्ष घनमीटर आहे. उपयुक्त पाणीसाठा १५६.५८० दशलक्ष घनमीटर असून उपयुक्त पाणीसाठ्याची टक्केवारी २२.२२ एवढी आहे. जिल्ह्यातील तावरजा, रेणापूर, व्हटी, तिरु, देवर्जन, साकोळ, घरणी व मसलगा या आठ मध्यम प्रकल्पांपैकी दोन मध्यम प्रकल्पांत ५१ ते ७५ टक्के पाणीसाठा आहे. दोन मध्यम प्रकल्प जोत्याखाली आहेत. १३४ लघ प्रकल्पांपैकी २ पुर्ण भरलेले, ४ लघू प्रकल्पांत ७५ टक्क्यांपेक्षा जास्त, ७ प्रकल्पांत ५१ ते ७५ टक्के, १५ प्रकल्पांत २५ ते ५० टक्के, ४८ प्रकल्पांत २५ टक्क्यांच्या खाली, ५४ लघु प्रकल्प जोत्याखाली तर ४ लघू प्रकल्प अद्यापही कोरडे आहेत. जिल्ह्यातील एकुण १४४ प्रकल्पांपैकी २ पूर्ण भरलेले, ४ प्रकल्पांत ७५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा, ९ प्रकल्पांत ५१ ते ७५ टक्के पाणीसाठा, १६ प्रकल्पांत २५ ते ५० टक्के पाणीसाठा, ५३ प्रकल्पांत २५ टक्के पाणीसाठा, ५६ प्रकल्प जोत्याखाली तर ४ प्रकल्प कोरडे आहेत.

# पदोन्नती मिळालेल्या पोलिस अधिका–यांचा सत्कार

लातूर : प्रतिनिधी लातूर जिल्हा पोलीस दलात कार्यरत पोलिसांना पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांचा एसपी कन्स्ट्रक्शनचे अभियंता यासीन महेबुब शेख यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. लातूर जिल्हा पोलिस दलात कार्यरत असलेल्या मुख्तार इब्राहीम शेख, अरुण मारुती तलवार, रामचंद्र भानुदास ढगे, पंडित लक्ष्मणराव भंडारे, आवेज काजी यांची सहायक पोलीस निरीक्षकपदी पदोन्नती मिळाली.



त्यानिमित्त त्यांचा शाल, पुष्पहार व पेढा भरवत सत्कार करण्यात आला. एसपी कन्स्ट्रक्शनच्या महात्मा गांधी चौकातील कार्यालयात झालेल्या या सत्कार समारंभास सेवा निवृत्त पोलीस अधिकारी महेबुब गल्लेकाटू, लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरसिंह घोणे, बालाजी पिचारे, मासूम खान, बाबा शेख, नितीन कांबळे, जहिर शेख, आबु शेख, बरकत काजी, जमील नाना, मारुती चव्हाण, मौलाना सादिक शेख, साबीर देशमुख यांच्यासह असंख्य मान्यवर उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE